MHKO120005352012

<u>दरखास्त क्र. १४/२०१२</u>

## निशाणी क्र. ३९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज ति-हाईत इसम हरकतदार यांनी दरखास्तीतून गट क्र. १६३ व २४० या वगळण्यात याव्यात याकरिता दिला आहे.

२. प्रस्तुत अर्जात हरकतदार यानी असे हरकत घेतली आहे की, हरकतदार ही ऋणको यांची बहिण आहे. यापुर्वी, न्यायालयाने गट क्र. १६३ व २४० या मिळकती जप्त करण्यात याव्यात असा आदेश नि. २७ ला पारित केला आहे. त्यानंतर सदर मिळकतीत हरकतदार यांचा हिस्सा आहे. संबंधीत मिळकतीचे पूर्णपणे वाटप झालेले नाही. ऋणको व हरकतदार यांचे पूर्वहक्कदार बाबूसो पाटील यांना ४ अपत्ये आहेत व त्यापैकी हरकतदार ही त्यांची वारसदार आहे. संबंधीत दरखास्तीमधील जप्तीचे कारवाईची माहिती हरकतदार यांना त्यांचे चुलत भाऊ विजय पाटील यांचेकडून फोनवरुन समजली. यापुर्वी, संबंधीत मिळकती या समाईक आहेत, अशी पुरसीस हरकतदार यांनी दिली आहे. वास्तविक गट क्र. १६३ चे ७/१२ ला जाबदाराने स्वतःचे नांवे नोंद करुन घेतले आहे व गट क्र. २४० चे ७/१२ ला इतर हक्कामध्ये जाबदाराची नोंद आहे व गट क्र. २४० ही मिळकत वर्ग – २ मधील आहे. वास्तविक ऋणको यांची स्वतःच्या मालकीचे मिळकती सामील न करता गट क्र. १६३ व २४० मधील मिळकती समाविष्ठ केल्या आहेत त्या चुकीच्या आहेत. त्यामुळे, संबंधीत मिळकती या दरखास्तीमधून वगळण्यात याव्यात अशी विनंती हरकतदार यांनी केली.

३. दरखास्तदार यांनी प्रस्तुतचे अर्जास म्हणणे नि. ४३ अन्वये दिले व असे कथन केले की, न्यायालयाने यापुर्वी, जो आदेश जप्तीबाबत पारित केला आहे तो योग्य आहे व कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन पारित केला आहे. जाबदार हा सरपंच असून प्रतिष्ठीत व्यक्ती आहे व हरकतदाराने मुदतीमध्ये हरकत घेतली नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा आक्षेप अर्ज नामंजूर करावा.

४.      दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५.      हरकतदारांचे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, जोपर्यंत ऋणको यांचे नावे असलेल्या जंगम मिळकती जप्त होत नाहीत तोपर्यंत स्थावर मिळकती जप्त करुन त्याचा लिलाव अथवा विक्री करता येणार नाही. तसेच हरकतदाराचा दावा मिळकतीत हिस्सा आहे त्यामुळे, अर्ज मंजूर करावा.

६.      धनको यांचेतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती करणेची विनंती केली.

७.      हरकतदार यांनी असा आक्षेप घेतला आहे की, ऋणको यांचे पूर्वहक्कदार बापूसा पाटील यांना ४ अपत्ये आहेत त्यापैकी वि. प. हेही आहेत व मिळकती या वडीलार्जित आहेत असा आक्षेप घेतला. परंतु, संबंधीत मिळकती या वडीलार्जितच आहेत हे दर्शविण्यामध्ये हरकतदार अपयशी ठरले आहेत. संबंधीत मिळकतींचे ७/१२ ला ऋणको यांचे नाव आहे. त्यामुळे, आक्षेपामध्ये तथ्य वाटत नाही. याउलट, धनको हे दरखास्तीमधील रक्कम मिळणेपासून अनेक वर्ष वंचित राहिले आहेत. त्यामुळे, त्यांना दरखास्तीचे फळ मिळणे अपेक्षित आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करणेत येतो.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2025.10.28 12:15:02 +0530

(एन. डी. रुद्रभटे)

**दिनांक :** २७/१०/२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
गोरगोटी